दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
# रायगड नगरी
रायगडसह ठाणे, नवी मुंबई, पुणे येथून प्रकाशित
• वर्ष १७ वे • अंक ३४ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.५ मे २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## सर्वोच्च न्यायालयाचा २ आठवड्यांचा अल्टीमेटम
# राज्यात लवकरच निवडणुका?

**दै.रायगड नगरी । मुंबई**

राज्यातील ओबीसी आरक्षणाचा प्रश्न सुटेपर्यंत राज्यातील निवडणुका पुढे ढकलण्याचा कायदा विधीमंडळाने मंजूर केला आहे. विशेष म्हणजे राज्यपालांनीही या कायद्यावर सही केल्याने कायदा लागू करण्यात आला. त्यामुळे, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सहा महिन्यांसाठी पुढे ढकलण्यात आल्या आहेत. मात्र, आता हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला २ आठवड्यांचा अल्टीमेटम दिला आहे.



मध्य प्रदेश सरकारने सात महिन्यांपूर्वी सुरु केलेली ओबीसींचा इम्पिरिकल डाटा तयार करण्यासाठीची प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नाही. ही प्रक्रिया अतिशय किचकट आणि व्यापक आहे. ओबीसींचे राजकीय मागासलेपण सिद्ध करणारा राज्य मागासवर्ग आयोगाचा अहवाल सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला असल्याने आता महाविकास आघाडी सरकारही विस्तृत असा इम्पिरिकल डाटा तयार करण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्यामुळेच, राज्यातील निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या आहेत. मात्र, आता सर्वोच्च न्यायालयाने यावरुन राज्य सरकारवर ताशेरे ओढले आहेत.

प्रलंबित स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकांचा कार्यक्रम २ आठवड्यात जाहीर करण्याच्या सूचना सुप्रीम कोर्टानं दिल्या आहेत. मार्च २०२० च्या जुन्याच प्रभाग रचनेनुसार निवडणुका घेण्याचे या आदेशात म्हटलं असून, राज्यात जवळपास १४ महापालिका २५ जिल्हा परिषदांसह अनेक नगरपंचायती ग्रामपंचायतींच्या निवडणुका प्रलंबित आहेत. ओबीसी आरक्षणावरील अंतिम सुनावणीत हे आदेश देण्यात आले आहेत.

सुप्रीम कोर्टात विकास गवळी यांनी याचिका दाखल केली होती. त्या याचिकेवर हे आदेश देण्यात आले आहेत. सुप्रीम कोर्टात राज्य सरकार बाजू मांडण्यास कमी पडल्याचा आरोप भाजप नेते चंद्रशेखर बावकुळे यांनी केला आहे.

ओबीसी आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्यास महाराष्ट्रातील सत्ताधारी आणि विरोधक अशा दोघांनी असहमती दर्शविली होती. त्यामुळेच, राज्य सरकारने निवडणुका पुढे ढकलण्यासाठी कायदा केला. आता न्यायालयाने पुन्हा एकदा ओबीसी आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे, राज्य सरकार काय पाऊल उचलणार याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

## मुख्यमंत्री कार्यालयाचा दुरुपयोग झाल्याप्रकरणी जनहित याचिका दाखल करणार : किरीट सोमय्या



**दै.रायगड नगरी । पनवेल**

हनुमान चालीसा आणि त्याविषयी असलेली भावना व त्यातून झालेले प्रतिकात्मक आंदोलन राजद्रोह कसा होऊ शकतो, असा सवाल भाजपचे ज्येष्ठ नेते माजी खासदार किरीट सोमेय्या यांनी ठाकरे महाविकास आघाडी सरकारला आज(दि. ०४) पनवेल येथे केला. तसेच कोर्लई अलिबाग येथील १९ बंगला घोटाळा लपविण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाचा दुरुपयोग झाल्याप्रकरणी जनहित याचिका दाखल करणार असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयास सोमेय्या यांनी सदिच्छा भेट दिली. त्यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, शहर अध्यक्ष जयंत पगडे, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, शहर सरचिटणीस नितीन पाटील, तालुका उपाध्यक्ष के. ए. म्हात्रे, शिक्षक सेलचे जिल्हाध्यक्ष के. सी. पाटील, माजी पंचायत समिती सदस्य निलेश पाटील उपस्थित होते.

यावेळी किरीट सोमय्या यांनी ठाकरे सरकार, संजय राऊत, आदित्य ठाकरे यांच्यावर तोफ डागली. तसेच सचिन वाझे, प्रदीप शर्मा यांचे कनेक्शन फक्त ठाकरे सरकारच्या घोटाळ्यांसाठी झाले असल्याचे अधोरेखित करतानाच मुंबईचे पोलीस आयुक्त संजय पांडे यांची संशयास्पद भूमिका प्रकर्षाने मांडली.

हनुमान चालीसाचे मातोश्री बाहेर पठण करण्याचा प्रामाणिक उद्देश घेऊन राणा दाम्पत्य मुंबईत आले मात्र ठाकरे सरकारला त्याची चीड आली आणि त्यांच्यामागे कार्यकर्ते आणि पोलिसांचा ससेमिरा लावण्यात आला. आणि त्याच्यापलीकडे जाऊन त्यांच्यावर उद्धव ठाकरेंच्या माफिया सरकारने राजद्रोहाचा गुन्हा दाखल केला. धार्मिक आणि सामाजिक भावना लक्षात घेता हा राजद्रोहाचा गुन्हा दाखल करणे अत्यंत निषेधार्थ आहे. उद्या पोलीस कोठडीतून नवनीत राणा आणि रवी राणा यांची सुटका झाल्यानंतर मी त्यांची मुंबईत भेट घेणार आहे आणि त्यांच्यावर राजद्रोहाचा गुन्हा दाखल झाला आहे त्याबद्दल त्यांची माफी मागणार आहे, असे आवर्जून नमूद करतानाच हिंमत असेल तर त्या ठिकाणी माझ्यावर हल्ला करायला गुंड पाठवावेत, असे आव्हानही त्यांनी ठाकरे यांना केले. शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सुपारी देऊन तीन वेळा माझी हत्या करण्याचा प्रयत्न केला होता आणि प्रत्येकवेळी मी वाचतो हे उद्धव ठाकरे यांचे दुर्दैव आहे, असा घणाघाती हल्ला सोमय्या यांनी केला.

.../२

## उरणमध्ये मनसे जिल्हाध्यक्षांसह पदाधिकाऱ्यांना पोलिसांनी घेतले ताब्यात

**दै.रायगड नगरी । उरण**



महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मशिदीवरील अनधिकृत भोंगा विषयी आवाज उठवला आहे .भोंगा न उतरविल्यास त्या पेक्षा मोठ्या आवाजात सर्वत्र हनुमान चालीसा वाचण्यात येईल. असे आदेश औरंगाबाद येथिल घेण्यात आलेल्या सभेत दिले होते.या वेळी कोणतेही परिस्थिती उद्भवेल असा इशारा राज ठाकरे यांनी भर सभेत दिला होता.त्या अनुषंगाने संपूर्ण राज्यात पोलिस प्रशासनाने कडक बंदोबस्त केला आहे.

उरण तालुक्यात ही कायदा व सुव्यवस्था बिघडू नये समाजात शांतता प्रस्थापित राहावी या दृष्टीकोणातून उरण मध्ये ही मशिद परिसरात चोख पोलिस बंदोबस्त तैनात केले होते.यावेळी उरण पोलिस ठाण्यातर्फे मनसेच्या जिल्हा अध्यक्षांसह पदाधिकाऱ्यांवर १५१(१) नु-सार प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली असून त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

ताब्यात घेतलेले मनसे पदाधिकारी मनसे रायगड जिल्हा अध्यक्ष संदेश ठाकूर,महाराष्ट्र प्रदेश चिटणीस मनसे वाहतूक सेना अल्पेश कडू ,उरण तालुका उपाध्यक्ष मंगेश वाजेकर, उरण तालुका संघटक सतिश पाटील, रायगड उप-जिल्हा संघटक मनसे रितेश पाटील यांना मनसे कार्यालय वाणीआळी, उरण या ठिकाणाहून ताब्यात घेण्यात आले. अशी माहिती सुनिल पाटील उरणचे वरिष्ठ पोलिस निरिक्षक सुनिल पाटील यांनी आहे.

## कर्नाळा खिंडीत मोटारसायकल अपघातात ५ वर्षीय मुलाचा मृत्यू, तिघे गंभीर जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव मोटारसायकलवरील नियंत्रण सुटल्याने सदरची मोटरसायकल रस्त्याच्या बाजुला असलेल्या भिंतीवर धडकली. या झालेल्या अपघातात मोटारसायकलवरील ५ वर्षीय मुलाचा मृत्यू तर त्याचे आई वडील व भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी रात्री मुंबई-गोवा महामार्गावर कर्नाळा खिंडीजवळ घडली. या घटनेत मोटारसायकल चालक असलेल्या मृत मुलाच्या वडीलांनी भरधाव वेगात, निष्काळजीपणे मोटारसायकल चालविल्याने सदरचा अपघात झाल्याचे आढळून आले. त्यामुळे पनवेल तालुका पोलिसांनी मृत मुलाच्या वडीलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

या अपघातात मृत झालेल्या मुलाचे वडील तेजस पाटील (३६), मृत मुलाचे नाव विहान पाटील (५वर्षे) सोनल पाटील (३२) आणि भाऊ जय ७ वर्षे असे असून जखमी झालेल्यामध्ये या तिघांचा समावेश आहे. सदरचे कुटुंब नेरुळ सेक्टर-१० मध्ये राहण्यास असून त्यांचे मुळगाव हे हे अलिबाग येथील पोयनाड येथे आहे. ३० एप्रिल रोजी सायंकाळी तेजस हा पत्नी व दोन मुलांसह आपल्या येथील आपल्या मुळ गावी जात होता. पॅशन मोटारसायकलवरुन अलिबाग यावेळी सोबत मोटारसायकलवर पाठीमागे पत्नी सोनल बसली तर दोघांच्या मध्ये ७ वर्षीय मुलगा जय बसला. तर ५ वर्षीय विहान हा तेजसच्या पुढे बसला.

रात्री पावणे आठ वाजण्याच्या त्यांची मोटारसायकल कर्नाळा खिंडीतील नागमोडी रस्त्याच्या वळणावरुन जात असताना, तेजसचे भरधाव वेगात असलेल्या मोटारसायकलवरून नियंत्रण सुटले. त्यामुळे त्याची मोटारसायकल तेथील भिंतीला धडकुन चौघेजण खाली पडून गंभीर जखमी झाले. त्यामुळे त्या सर्वांना एमजीएम हॉस्पीटलमध्ये दाखल करण्यात आले. यात गंभीर जखमी असलेला विहान याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या अपघातात तेजस पाटील याने भरधाव वेगात निष्काळजीपणे मोटारसायकल चालवुन नेल्यामुळे सदरचा अपघात झाल्याचे आढळुन आल्याने पनवेल तालुका पोलिसांनी तेजस पाटील विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## संक्षिप्त...

### नवनीत राणा-रवी राणांचा आजचा मुक्कामही जेलमध्येच

**दै.रायगड नगरी । मुंबई**

खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा या दामपत्यांची आजची रात्र ही तुरुंगात जाणार आहे. सत्र न्यायालयाने आज सकाळीच निकाल दिला असला तरी कागदोपत्री प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी विलंब लागल्याने राणा दामपत्या ला आज ची रात्र तुरुंगातच काढावी लागणार आहे.

आमदार रवी राणा यांना जामीन अर्ज मंजूर झाला असला तरी आजची रात्रही तळोजा कारागृहातच जाणार आहे. जामीनाची प्रत कारागृह प्रशासनाला अद्याप मिळाली नसल्याने राणा यांना बुधवारची म्हणजे आजची रात्र कारागृहातच घालवावी लागणार आहे. कारागृह प्रशासनाने सायंकाळी ५.३० टपाल पेटित जमिनीची प्रत आढळली नसल्याने राणांचा एक दिवसाचा कारागृहातील मुक्काम वाढला आहे. तर खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांची आज तुरुंगातून सुटका करण्यात येणार नाही कारण त्यांच्या सुटकेचे आदेश संबंधित दंडाधिकारी न्यायालयाकडून वेळेत मिळू शकले नाहीत. त्यांची टीम उद्या सकाळी कोर्टाकडून सुटकेचे आदेश प्राप्त करेल आणि नंतर भायखळा आणि तळोजा कारागृहात जाईल, अशी माहिती मिळत आहे. त्यामुळे रवी राणा यांना तळोजा कारागृहात तर नवनीत राणा यांना भायखळा कारागृहात आजची रात्रं काढावी लागणार आहे. शिवसैनिकांचं श्रद्धास्थान असलेल्या मातोश्री बंगल्यासमोर हनुमान चालिसा पठण करण्याचे आव्हान देणाऱ्या राणा दाम्पत्याविरोधात शिवसैनिक आक्रमक झाल्यानंतर खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राणा यांच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली होती. जवळपास १२ दिवस कोठडीत राहिल्यानंतर राणा दाम्पत्याला सत्र न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे.

## प्रगतशील शेतकऱ्याला कौतुकाची थाप; तहसील कार्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल मधील प्रगतशील शेतकरी सज्जन पवार यांना तहसीलदार कार्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात आमदार प्रशांत ठाकुर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तहसीलदार विजय तळेकर यांच्या पुढाकाराने हा कार्यक्रम आयोजित केला होता.

यावेळी कोविड काळात उत्तम कार्य केलेल्या कोविड योध्यांना सन्मानित करण्यात आले.सज्जन पवार यांनी पनवेल मध्ये पहिला स्ट्रॉबेरीचा यशस्वी प्रयोग राबवला होता.तसेच २०२० -२१ जिल्हा भातपीक स्पर्धेमध्ये सज्जन पवार हे तालुक्यात प्रथम आले आहेत.याच स्पर्धेत जिल्ह्यामध्ये दुसरा क्रमांक त्यांनी पटकाविला आहे.पवार यांचा पहिला क्रमांक अवघ्या ७५ ग्रॅम कमी उत्पादन झाल्याने हुकला होता. सदर कार्यक्रमास लोकप्रतिनिधी , स्वातंत्र्य सैनिक, तालुक्यातील विविध शासकीय कार्यालय प्रमुख उपस्थित होते. सदर कार्यक्रम प्रसंगी कोविड -१९ या साथरोगाच्या प्रभावी नियंत्रणासाठी ज्या अधिकारी व कर्मचारी यांनी मोलाची भूमिका बजावली अश्या आरोग्य विभागातील डॉक्टर व कर्मचारी, महसूल विभाग कर्मचारी, कृषी विभाग, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग कर्मचारी तसेच पोलीस पाटील , रेशन दुकानदार तसेच तालुक्यातील प्रगतिशील शेतकरी व राष्ट्रीय स्तरावरील धनुर्विद्या या खेळात प्राविण्य मिळविलेल्या खेळाडू यांचा सत्कार प्रमाणपत्र देऊन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आला.सदर कार्यक्रमास पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, लोकप्रतिनिधी, स्वातंत्र्य सैनिक , पत्रकार तसेच शासकीय अधिकारी पनवेल प्रांत अधिकारी राहुल मुंडके, तहसीलदार विजय तळेकर, अपर तहसीलदारशेतजमीन न्यायाधिकरण अभिजित खोले , गट विकास अधिकारी संजय भोये, सार्वजनिक बांधकाम विभाग सहाय्यक अभियंता श्रेणी एक एन व्ही भोये , तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सुनील नखाते, एकात्मिक बालविकास प्रकल अधिकारी पनवेल चेतन गायकवाड उपस्थित होते .

## पनवेल मार्गे लांब पल्ल्यांच्या रेल प्रवासी सेवा १० मे पासून सुरू होणार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

कोविड-१९ मुळे ओढवलेल्या लॉकडाऊनमुळे मध्य रेल्वे प्रशासनाकडून पनवेल मार्गे जाणाऱ्या लांब पल्ल्यांच्या रेल सेवा बंद करण्यांत आल्या होत्या. त्या संदर्भात त्या रेल सेवा पुन्हा सुरू करण्यासाठी नुकतीच प्रवासी संघ, पनवेल चे पदाधिकारी व अध्यक्ष डॉ.भक्तिकुमार दवे, उपाध्यक्ष यशवंत ठाकरे, कार्यवाह व उपनगरीय रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य श्रीकांत बापट यांनी रेल्वेच्या उच्च, जेष्ठ अधिकाऱ्यांशी व महसुल शासनांच्या रेल्वे संबंधातील अधिकाऱ्यांशी चर्चा केली आहे. रेल्वे प्रवासी सेवा पुनश्च सुरू करण्यासंबंधीचे काही अधिकार त्या काळात महाराष्ट्र शासनाकडे होते. आता कोविड १९ परिस्थतीमुळे रेल्वे प्रशासनाकडे अधिकार परत आल्याने कोविड स्थिती नियंत्रणात अशीच राहील्यास खालील लांब पल्ल्यांच्या रेल सेवा १० मे पासून व्हाया पनवेल मार्गे सुरू करण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न चालू आहेत. असे आमच्या वार्ताहारांना प्रवासी संघ, पनवेलच्या कार्यकारीणी कडून सांगण्यात आले आहे. व्हाया पनवेल मार्गे धावणाऱ्या रेल सेवा अहमदाबाद-चेन्नई(१९४१९-२०), अहमदाबाद-चेन्नई(हमसफर) (२२९१९-२०) पुणे-भुसावळ एक्सप्रेस(११०२५-२६), लो.टि. टरमिनल- हुबली(व्हाया-पनवेल-सोलापूर)(१७३२१-२२), पुणे-इंदोर(व्हाया-पनवेल-वसई मार्गे(१९३११-१२), पुणे-मुंबई(प्रगती एक्सप्रेस)-(१२१२५-२६), पनवेल-पुणे पॅसेंजर (५१३१७-१८)

## तत्काळ तिकिटांवर एजंटांचा डोळा;पनवेल मधील प्रकार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

तत्काळ तिकीट काढण्यासाठी आपलीच माणसे उभे करून इतर प्रवाशांना धमकाविण्याचा प्रकार पनवेल रेल्वे स्थानकात घडला आहे.यासंदर्भात अनिल औटी या प्रवाशांनी विभागीय रेल्वे अधिकारी ( डीआरएम ) या वरिष्ठ अधिकाऱ्याकडे तक्रार केली आहे.

तत्काळ आरक्षित तिकीट काढण्यासाठी रेल्वे मंत्रालयाची ऑनलाईन वेबसाईट काही काळच सुरु असते.दोन मिनिटात आरक्षित तिकीट काढण्यासाठी रेल्वे स्थानकावर तिकीट खिडकी समोर थांबावे लागते. पहिल्या येणाऱ्या ३ ते ४ जणांना हे तत्काळ तिकीट मिळत असतात. मात्र रेल्वे स्थानकातील एजंट आपली माणसे या रांगेत उभी करून तत्काळ तिकीट आपल्या पारड्यात पाडून घेत असतात.

यामुळे गरजुंना तत्काळ तिकीट वेळेत मिळत नाही.असाच प्रकार औटी यांच्याबाबतीत घडून ते मित्राला जौनपूर युपी याठिकाणचे तिकीट काढण्यासाठी गेले असता पनवेल रेल्वे स्थानकातील शेख इम्तियाझ नामक दलालांनी शेख औटी यांना धमकावले.

तत्काळ तिकिटासाठी कोणत्याही परिस्थितीत तुम्हाला रांगेत उभे राहून देणार नसल्याची धमकी औटी यांना दिल्यांनतर त्यांनी थेट या प्रकाराची वरिष्ठ पातळीवर तक्रार केली.तक्रार केल्यानंतर प्रशासन खडबडून जागे झाल्यांनतर तत्काळ तिकीट खिडकीजवळ एजंट फिरकले नाहीत. तसेच सर्व यंत्रणा सतर्क झाली असल्याचे औटी यांनी सांगितले. रेल्वे स्थानकात सर्रास हा प्रकार सुरु असून प्रशासनातील सर्व अधिकारी याप्रकरणात गप्प असल्याचा आरोप औटी यांनी केला आहे.

### पालीतील जळालेला मेणबत्ती व सुगंधी तेल निर्मिती
## कारखाना बंद करण्याची नगरपंचायतची मालकाला नोटीस



पालीतील कुंभारआळी जवळील भर वस्तीत असलेल्या मेणबत्ती व सुगंधी तेल निर्मिती कारखान्याला मंगळवारी (ता.३) दुपारी भीषण आग लागली होती. या घटनेची दखल घेत बुधवारी (ता.४) पाली नगरपंचायतीने 'इंडियन व्हेस्क फेम पार्टनर' या कारखान्याच्या मालकांना नागरी वस्तीतील कारखाना (आस्थापना) बंद करण्यासंबंधी पत्र दिले आहे.

या पत्रात म्हंटले आहे की महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षण उपाययोजना अधिनियम नियम-२००६ च्या अनुषंगाने चालवत असलेली आस्थापना आवश्यक त्या उपायोजना करण्यास अपयशी ठरल्याचे निदर्शनास आलेले आहे.

ज्याअर्थी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवन संरक्षण उपाययोजना अधिनियम २००६ (२००७ चा महा ३) यांच्या तरतुदीखाली आवश्यक केल्याप्रमाणे या कारखान्यात बसविण्यात आलेली आग प्रतिबंधात्मक साधने सुस्थितीत व कार्यन्वयीत स्थितीत ठेवण्यात आलेली नाहीत. तसेच त्या संदर्भीय कुठल्याही उपाययोजना आढळुन आलेल्या नाहीत. मेणबत्ती उत्पादन म्हणजे पेट्रोलियम सारखेच अती ज्वलनशील उत्पादन आपण कुठल्याही योग्य त्या सुरक्षाव्यवस्था व्यतीरीक्त करून लोकांच्या जिवाशी खेळत आहेत. त्याचप्रमाणे सनफ्लॉवर ऑइलने भरलेले डबे कुठल्याही सुरक्षा शिवाय उघड्या आग भट्टांसमोर दिसुन येत आहेत. या कारखान्याच्या चारही बाजुला अत्यंत घनदाट वस्ती असल्याने कारखान्याच्या प्रदुषणाचा खुप मोठा त्रास येथे राहणाऱ्या जनतेला सातत्याने होत आहे.

या कारखान्यामुळे सार्वजनिक जीवीतास बाधा पोहोचत आहे. त्यामुळे नोटिस मिळाल्या पासून आपली हा कारखाने सांगितलेल्या उपाययोजना करेपर्यंत व सक्षम प्राधीकरणाच्या सर्व परवानग्या घेऊन योग्य त्या उपाययोजना करे पर्यंत बंद ठेवण्यात यावा. आणि आपला कारखाना (आस्थापना) नागरी वस्तीतून बाहेर काढण्यात यावा असे पत्रात नमूद केले आहे.

# करोना आणि कोर्ट

करोनाची पहिली लाट आल्यापासूनच देशातील विविध पातळीवरील न्यायालयांनी अनेक प्रकारचे निकाल या साथीच्या निमित्ताने दिले आहेत. सर्वोच्च न्यायालयाने तर करोनामृत्यू झालेल्या नागरिकांच्या नातलगांना भरपाई दिली जाते की नाही, यावर देखरेख ठेवण्याचीही व्यवस्था केली होती. त्याचप्रमाणे, लसीकरण, करोनामृत्यूंची खरी आकडेवारी, उपचारसुविधा.. अशा अनेक मुद्द्यांचा विचार विविध न्यायालयांनी केला आहे. आता सर्वोच्च न्यायालयासमोर आलेली याचिका डॉ. जेकब पुलियेल यांची होती आणि तीत सरसकट प्रत्येक नागरिकाला करोनाची लस घेण्याची सक्ती करता येणार नाही, असा दावा केला होता. त्याचप्रमाणे, करोनासंबंधीच्या वैद्यकीय चाचण्या आणि लसीकरणानंतरचे विपरीत वैद्यकीय परिणाम यांचा सर्व तपशील सादर करण्यात यावा, अशी मागणीही या याचिकेत करण्यात आली होती. सर्वोच्च न्यायालयाने ही याचिका उचलून धरली आहे आणि राज्यघटनेच्या एकविसाव्या कलमाचा आधार घेत नागरिकांचे व्यक्तिस्वातंत्र्य आणि स्वत:च्या देहावरील अधिकार या याचिकेच्या संदर्भात महत्त्वाचा मानला आहे. थोडक्यात, आजच्या परिस्थितीत कोणत्याही नागरिकावर करोनाची लस टोचून घेण्याची सक्ती करता येणार नाही, असे खंडपीठाने म्हटले आहे. जगातही अशा प्रकारचे अनेक न्यायालयीन विवाद झाले आहेत. जगातील अनेक देशांमध्ये कित्येक नागरिक करोना आल्यापासूनच लस टोचून घेण्यास विरोध करीत आहेत. तसे काही नागरिक महाराष्ट्रात, भारतातही आहेत. लसीकरणाला नकार देण्याची या नागरिकांची कारणे जशी वैद्यकीय आहेत तशी ती धार्मिकही आहेत. नोवाक जोकोविच या जगविख्यात टेनिस खेळाडूचा हट्ट तर साऱ्या जगाने पाहिला आहे. स्पर्धा न खेळता देश सोडावा लागला तरी त्याने आपला आग्रह सोडला नाही. या पार्श्वभूमीवर भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या असणाऱ्या आणि आरोग्य व्यवस्थेचे अत्यंत ढिसाळ जाळे असणाऱ्या महाकाय देशात काही व्यक्तींचे लस न घेण्याचे व्यक्तिस्वातंत्र्य हे व्यापक समाजहिताच्या आड तर येणार नाही ना, हा प्रश्न मोलाचा ठरतो. सुदैवाने, सर्वोच्च न्यायालयाने व्यक्तिस्वातंत्र्याचा आदर करून दिलेल्या या निकालात अनेक संभाव्यतांचा आणि वर्तमान स्थितीचा विचार केला आहे. 'आजच्या स्थितीत' ही सक्ती करता येणार नाही, असे जेव्हा खंडपीठ म्हणते; तेव्हा सध्या तरी आटोक्यात आलेली करोनाची महामारी न्यायमूर्तींनी विचारात घेतलेली दिसते. लस न घेतलेली व्यक्ती समाजात मुक्तपणे फिरून इतरांना मात्र करोनाची लागण देऊ शकते, ही शक्यताही खंडपीठाने नजरेआड केलेली नाही. त्यामुळे, अशा लस न घेण्याचे व्यक्तिस्वातंत्र्य उपभोगणाऱ्या नागरिकांच्या मुक्त संचारातून उद्भवू शकणाऱ्या धोक्यांची जबाबदारी न्यायालयाने सरकारवर किंवा प्रशासनावर टाकली आहे. समाजात रोगाचा फैलाव होत असेल तर लस न घेतलेल्या व्यक्तींच्या समाजातील वावरावर बंधने घालण्याचा विचार प्रशासन करू शकते, असेही या निकालात म्हटले आहे. याचा सरळ अर्थ, तुम्हाला लस न घेण्याचे स्वातंत्र्य मिळवायचे असेल तर समाजात साथ असताना मुक्तपणे फिरता येणार नाही. तुमच्यावर प्रशासन बंधने लादू शकते. या दोन्ही अवस्थांमध्ये एक प्रकारचा अंगभूत अंतर्विरोध अनुस्यूत आहे. स्वातंत्र्य मिळविण्यासाठीची बंधने, असे त्याला म्हणता येईल. तसेही, कोणतेही स्वातंत्र्य जबाबदारीविना अर्थहीन असते. त्यामुळे, लस न घेण्याचे स्वातंत्र्य उपभोगणाऱ्यांना आपल्यामुळे इतरांना त्रास न होण्याची जबाबदारीही घ्यावी लागेल. भारतातली लोकशाही आणि ती चालविणाऱ्या साऱ्या यंत्रणा या निकालातील सूक्ष्म पदर आणि धागेदोरे अमलात आणण्याइतक्या प्रगत आणि दक्ष आहेत का, हा यातला खरा प्रश्न आहे. देशात अनेक ठिकाणी रुग्णांना जनावरांपेक्षा किंचितच बरी वागणूक मिळते. भारताच्या लस देण्याच्या धडाक्याचे जगभर जे कौतुक होते आहे; त्यातही सरकारी यंत्रणांना वरून आलेला सक्त आदेश पाळताना हडेलहप्पी करण्याची जी सवय लागली आहे, तिचे श्रेय बरेच आहे. या पार्श्वभूमीवर ऐच्छिक व स्वस्त असूनही बूस्टर डोस घेण्यास भारतीय टाळाटाळ करीत आहेत. याचा अर्थ कसा लावायचा? अवघ्या काही महिन्यांपूर्वी माणसे धडाधड मरून पडत होती. स्मशानांमध्ये जागा नव्हती. तरीही, दुसरी लसमात्रा झाल्यानंतर 'आता तिसरी मात्रा काय करायची आहे?' असे बिनदिक्कत लोक म्हणत आहेत. गेल्या दोन-तीन दिवसांतील आकडेवारी पाहिली तर काही ठिकाणी करोनाचे रुग्ण वाढत आहेत. उद्या दुर्दैवाने हे आकडे वाढले तर पळापळ सुरू होईल. लस न घेण्याचे स्वातंत्र्य आम्ही मान्य करतो; मात्र, इतर निर्बंधांबाबत आम्ही काही म्हणत नाही, असे न्यायमूर्तींना म्हणावे लागले. हे नागरिकांचे मास्क न वापरणे, नियम मोडून गर्दी करणे या वर्तनाकडे निर्देश करणारे आहे. समाजाचा अवाढव्य गाडा पुढे जात असतो; तेव्हा काहींना वेगळ्याच वाटांवरच्या हाका ऐकू येत असतात. त्या हाकांचे प्रतिध्वनी ऐकायचे असतात. मात्र, सगळ्या समाजाचा गाडा मुख्य महामार्ग सोडून अचानक आडवाटांवर जाऊ किंवा धावू शकत नाही.

# श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण यांच्या वतीने ई-श्रम कार्ड वाटप व वृक्षारोपण

**दै.रायगड नगरी । उरण**

आज आपण पहातो की, वाढदिवस साजरा करायचा म्हटला की मोठमोठे हॉटेल किंवा मौजमजेच्या ठिकाणाची निवड केली जाते आणि वाढदिवसाची मजा लुटली जाते परंतु सामाजिक बांधिलकीचा मनुष्यास विसर पडत आहे. परंतु हीच सामाजिक बांधिलकी जपण्याचे कार्य व आपला वाढदिवस काहीतरी समाजहितासाठी साजरा व्हावा या उद्देशाने श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण या संस्थेच्या अध्यक्षा रायगड भुषण संगिता ताई ढेरे यांनी आपला वाढदिवस वृक्षारोपण व ई-श्रम कार्ड वाटप करून साजरा केला.



दिनांक ३/५/२०२२ मंगळवार रोजी सकाळी ११ वाजता कोटगाव काळाधोंडा येथील जिल्हा परिषद शाळेच्या आवारातील मोकळ्या जागेत, व व्यायाम शाळेच्या आजुबाजुला शोभेची झाडे व फुलझाडे लावून वृक्षारोपण करण्यात आले.तसेच ई-श्रम कार्ड वाटपाचा कार्यक्रमहि मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

वृक्षारोपण व ई-श्रम कार्ड वाटप या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून केअर ऑफ नेचर चे अध्यक्ष रायगड भूषण राजु मुंबईकर, समाजसेवक अनिल घरत, कोटगावचे अध्यक्ष योगेश गोवारी, काळाधोंडा जिल्हा परिषद शाळेचे चेअरमन नवनीत भोईर, जेष्ठ नागरिक शंकर भोईर, कोटगावचे पंच कमिटी सदस्य जितेंद्र भोईर, व इतर कोटगाव ग्रामस्थ, श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण च्या अध्यक्षा संगिता ताई ढेरे, उपाध्यक्षा पुजा प्रसादे,वैदेही वैवडे, कविता म्हात्रे, सुप्रिया सरफरे,अभया म्हात्रे, सारीका भोईर, , कु.महिमा म्हात्रे, तृप्ती भोईर कु.साहिल प्रसादे, शाम भाऊ भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

मान्यवरांना एक एक वृक्ष देऊन त्यांचाही सत्कार करण्यात आला. केअर ऑफ नेचर चे अध्यक्ष राजु मुंबईकर यांनी श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण या संस्थेसाठी ई-श्रम कार्ड मोफत उपलब्ध करून दिले. तसेच सामाजिक कार्यकर्ते राजु मुंबईकर,समाजसेवक अनिल घरत यांनी संगिता ताई ढेरे यांच्या हातुन वेळोवेळी होणाऱ्या समाजकार्यातील योगदानाचा विशेष उल्लेख केला. जमलेल्या प्रत्येक मान्यवरांच्या हस्ते शोभेची व फुलझाडे लावण्यात आली. तसेच या लावलेल्या झाडांना पाणी घालण्याची जबाबदारी कोटगाव ग्रामस्थांनी घेतली आहे. श्री समर्थ कृपा सखी स्वयंसहायता संस्था उरण च्या अध्यक्षा संगिता ताई ढेरे व त्यांच्या सहकारी टिमचे कोटगाव ग्रामस्थांनी आभार मानले.

# भांडणाच्या कारणाचा राग मनात धरून लोखंडी रॉडने केली मारहाण

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भांडणाच्या कारणाचा राग मनात धरून लोखंडी रॉड व लाकडी बांबू व वायरने मारहाण केल्याची घटना कळंबोली परिसरात घडली आहे. याप्रकरणी चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कळंबोली, सेक्टर २ ई येथे राहणारे माथाडी कामगार अरुण शिंदे यांना ३० एप्रिल रोजी मित्राचा फोन आला. व अमरजित केवर यांना मुले मारत असल्याचे त्यांना सांगण्यात आले. यावेळी कातकर वाडीतील मुले अमरजीत यांना धक्काबुक्की करत होते. त्यांना समजावण्याचा प्रयत्न अरुण शिंदे यांनी केला. यावेळी करण नाईक या मुलांने अरुण शिंदे यांच्या डोक्यात हेल्मेट मारले. करण नाईक, विकी लॉरी, अजय नाईक यांनी शिवीगाळ व धक्काबुक्की केली. ही गोष्ट किरकोळ असल्याने शिंदे पोलीस स्टेशनला तक्रार देण्यासाठी गेले नाहीत. त्यानंतर १ मे रोजी शिंदे स्मृतीवन गार्डन येथे बसले होते. यावेळी विकी लोरी व करण नाईक हे वायर व रॉड घेऊन आले. यावेळी शिंदे यांना पकडून वायर व बांबूने मारहाण केली. व लोखंडी रॉडने त्यांच्या डोक्यात वार केला. यावेळी शिंदे जखमी झाले.

# छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सवा निमित्त विशेष प्रबोधन संमेलनाचे पनवेलमध्ये आयोजन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

रायगड जिल्ह्यातील आकुर्ली ग्रामपंचायत परिसरात म्हसकर डेअरी फार्म आकुर्ली बसस्टॉप येथे छत्रपती संभाजी महाराज जन्मोत्सवा निमित्त विशेष प्रबोधन संमेलनाचे पनवेलमध्ये आयोजन करण्यात आले आहे.

छत्रपती क्रांती सेना पन-वेल या संघटनेच्यावतीने सदर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती छत्रपती क्रांती सेना पनवेलचे प्रभारी मनोज महाले व आयोजक श्रीयश म्हसकर यांनी दिली.

कार्यक्रमाच्या अनुषंगाने जेष्ठ इतिहास संशोधक डॉ. श्रीमंत कोकाटे प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार आहेत.

राष्ट्रीय पिछडा(ओबीसी) वर्ग मोर्चा महाराष्ट्र चे राष्ट्रीय प्रचारक डॉ. अनिलकुमार माने यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाचे उदघाट्न पंढरीनाथशेठ फडके यांच्याहस्ते होणार आहे.


मे.सोनावणे सो.. यांचे कोर्टात

अॅड.राजकुमार व्ही. जाधव

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.५९८/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२२/०६/२०२२

कै.मोहन गंगाराम बेलोसे मयतचे वारस
श्रीमती.विमल महादेव बेलोसे
पुर्वाश्रमीची विमल गजानन पाटील
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.अंधार आळी गिरोबा मंदिर जवळ, रोहा,
ता.रोहा, जि.रायगड — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार ही कै.महादेव गंगाराम बेलोसे यांची पत्नी आहे. तसेच कै.महादेव गंगाराम बेलोसे यांची आई कै.दृपदा गंगाराम बेलोसे यांचे निधन मु.रोहा, ता.रोहा, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेले आहे. तसेच कै.महादेव गंगाराम बेलोसे यांचे निधन दि.१५/१२/२०१३ रोजी मु.रोहा, ता.रोहा, जि.रायगड येथे राहत्या घरी झालेला असून अर्जदार श्रीमती.विमल महादेव बेलोसे पुर्वाश्रमीची विमल गजानन पाटील ह्यांनी कै.महादेव गंगाराम बेलोसे यांच्या मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : नढाळ, ता.खालापूर, जि.रायगड**

| गावाचे नांव | स.नं./हिस्सा नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|
| नढाळ | १६५/१९१ | ०-०१-८५ | 0.00 |
| | १६५/१९४ | ०-०१-८५ | 0.00 |

अर्जदार या कै.महादेव गंगाराम बेलोसे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे कोर्ट अर्जदार यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.महादेव गंगाराम बेलोसे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.४/०५/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण



सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड यांचे कार्यालय
शुक्रतारा बिल्डींग, तळमजला, कामतआळी, सत्कार प्रेस समोर, ता.अलिबाग, जि.रायगड
दूरध्वनी क्रमांक / फॅक्स क्र. ०२१४१-२२२०१३ ईमेल : ddr_rgd@rediffmail.com

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री व्यवस्थापन हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ पोटकलम (३) अन्वये मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज

**जाहीर नोटीस**

अध्यक्ष, गुलरेज अपार्टमेंट सहकारी गृहनिर्माण संस्था.मर्या, सर्वे नं.२७०/१, पनवेल, उरण रोड, पनवेल, जि.रायगड अर्जदार यांनी मे.राणा कन्स्ट्रक्शन तर्फे भागीदार (विकासक) शकील अहमद फकी, प्लॉट नं.५५, सिराज मेन्शन, तिसरा मजला, पीरख नं.स्ट्रीट मुंबई-८ २) श्री.मुल्ला हमीद महमद सईद (मयत) यांचे वारसदार (जागा मालक) १) शफीया बाबी ज.अ.हमीद मुल्ल २) मुल्ला म.युसूफ अ.हमीद ३) मुल्ला अ.मजिद अ. हमीद ४) मुल्ला म.नुर अ.हमीद ५) मुल्ला म.सईद अ.हमीद ६) मुल्ला सगीर म.अ.हमीद ७) बिलकीन बेगम ज.अ.तुंगेकर ८) अकतर नीसा ज.अ.तुंगेकर ९) मोहसीना ज.अ.समद खतीब १०) नादिरा बेगम ज.अरिफ ठाकूर ११) मुल्ला हसीब म.युसूफ १२) मुल्ला मतीन म.युसूफ १३) मुल्ला सबीहा म.युसूफ १४) दिवाण मिनाझ नवीद व इतर वारसदार १ ते १४ रा.प्लॉट नं.२७०, उरण रोड, मुल्ला अ.रोड पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांचे विरुद्ध खालील मालमत्तेची एकतर्फी मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळणेबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पनवेल महानगरपालिका हद्दीतील फायनल प्लॉट नं.२७०/१, क्षेत्रफळ १०७१ चौ.मीटर व त्यावरील अर्जदार संस्थेची इमारत आणि सामायिक सुविधांसह**

अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व संबंधितांनी आपले म्हणणे सादर करणेसाठी दि.२१/०४/२०२२ रोजी सुनावणी घेतली आहे. गैरअर्जदार सर्व अनुपस्थित त्यांचे पत्यावर सुनावणीची नोटीस रजिस्टर्ड ए.डी.ने पाठविण्यात आली असता पाकीट प्राप्त नाही. परंतु पोस्टाचे अधिकृत वेबसाईटवरील ट्रॅक रिपोर्टनुसार ''Insufficient Address'' आणि ''No such person in the Address'' असा शेरा आहे. सबब गैरअर्जदारांना लेखी म्हणणे दाखल करणेकरिता जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी विहित रितीने अर्जदाराच्या अर्जाबाबत आपले म्हणणे मांडण्यासाठी निम्न स्वाक्षरीकार यांचे कार्यालयात दि.६/६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे. सदर रोजी गैरअर्जदारातर्फे कोणीही उपस्थित राहिले नाहीत अगर त्यांनी म्हणणे मांडले नाही तर त्यांचे ''काहीही म्हणणे नाही'' असा निष्कर्ष नोंदवून त्यांचे गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करून कायदेशीर निर्णय पारित करण्यात येईल.

**सही/-**
**(डॉ.सोपान शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**



सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था रायगड यांचे कार्यालय
शुक्रतारा बिल्डींग, तळमजला, कामतआळी, सत्कार प्रेस समोर, ता.अलिबाग, जि.रायगड
दूरध्वनी क्रमांक / फॅक्स क्र. ०२१४१-२२२०१३ ईमेल : ddr_rgd@rediffmail.com

महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत (त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री व्यवस्थापन हस्तांतरण त्यांचे नियमन करण्याबाबत) अधिनियम १९६३ चे कलम ११ पोटकलम (३) अन्वये मानीव अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळणेसाठी अर्ज

**जाहीर नोटीस**

अध्यक्ष, प्रभात सहकारी गृहनिर्माण संस्था, मर्या.पालीदेवद, सुकापूर, नवीन पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड अर्जदार यांनी मे.सनदिप असोसिएट तर्फे भागीदार १) श्री.एल.आर.व्यंकटरमण, रा.फ्लॅट नं.६१५, अरेंजा कॉर्नर, सहावा मजला, सेक्टर १७, वाशी, नवी मुंबई २) श्री.ओमप्रकाश मांगेराम आगरवाल (जागा मालक), मे.सुर्यप्रभा इंटरप्रायझेस, १ यदुकुल पोस्टल कॉलनी रोड, चेंबुर, मुंबई-७१ यांचे विरुद्ध खालील मालमत्तेचे एकतर्फी मानवी अभिहस्तांतरण प्रमाणपत्र मिळणेबाबत दि.१७/०२/२०२२ रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

संस्थेचे वर्णन

प्रभात को.ऑप.सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या. सर्व्हे ३५ व प्लॉट २, पालीदेवद, सुकापूर, नवीन पनवेल, जि.रायगड ४१०२०६, रायगड क्षेत्रफळ ८१८ चौ.मीटर

अर्जदाराचे अर्जाबाबत सर्व संबंधितांनी आपले म्हणणे सादर करणेसाठी दि.६/७/२०२१, १९/०७/२०२१ व २१/०४/२०२२ रोजी सुनावण्या घेण्यात आहेत. गैरअर्जदार यांचे कार्यालय पत्यावर सुनावणीची नोटीस रजिस्टर्ड ए.डी.ने पाठविण्यात आली असता सदर नोटीस पाकीट पोस्टाच्या ''Address left'' अशा शेऱ्यासह परत आले आहे. सबब गैरअर्जदारांना लेखी म्हणणे दाखल करणेकरिता जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, त्यांनी विहित रितीने अर्जदाराच्या अर्जाबाबत आपले म्हणणे मांडण्यासाठी निम्न स्वाक्षरीकार यांचे कार्यालयात दि.६/६/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे. सदर रोजी गैरअर्जदारातर्फे कोणीही उपस्थित राहिले नाहीत अगर त्यांनी म्हणणे मांडले नाही तर त्यांचे ''काहीही म्हणणे नाही'' असा निष्कर्ष नोंदवून त्यांचे गैरहजेरीत एकतर्फी कामकाज करून कायदेशीर निर्णय पारित करण्यात येईल.

**सही/-**
**(डॉ.सोपान शिंदे)**
**सक्षम प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक**
**सहकारी संस्था, रायगड अलिबाग**



मा.एम.एन.वाली कोर्ट

अर्जदारातर्फे वकील
अॅड.स्वानंद भा. नवाळे

**जाहीर नोटीस**

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्रं.१९९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१०/०६/२०२२

श्री.रवींद्र मोहन कडू, वगैरे — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाले

या जाहीर नोटसीद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, मौजे : करळ, ता.उरण, जि.रायगड येथील मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतींचे वर्णन**

**अ) मौजे : करळ, ता.उरण, जि.रायड**

| मौजे | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|
| करळ | २१ अ | १२८ | १४ | ०-०४-०५ |
| करळ | २१ ब | १२९ | २ | ०-१७-०८ |
| करळ | | १३६ | ४ अ | ०-०७-०४ |

**ब) मौजे : करळ, ता.उरण, जि.रायड**

| अनु क्र. | युनिट केस नं. | मौजे | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|
| १ | ७९ | करळ | १७७ | १ ब | ०-०१-०४ |
| २ | | करळ | १७९ | ८ | ०-०२-०० |
| ३ | | करळ | २७ | १ | ०-१३-०० |
| ४ | ५७ | करळ | १०३ | ६ | ०-११-०० |
| ५ | | करळ | १८७ | ९ | ०-००-०८ |

कै.मोहन काथोर कडू हे दि.२५/१२/२०१९ रोजी मयत पावले असून, त्यांना अर्जदार क्र.१) श्री.रवींद्र मोहन कडू, २) श्री.सत्यजित मोहन कडू, ३) सौ.वैशाली मिथुन घरत असे आहेत. अर्जदार नं.१ व २ हे त्यांचे मुले आहेत, तर अर्जदार क्र.३ ही विवाहित मुलगी आहे. कै.मोहन काथोर कडू, यांची पत्नी सुनंदा मोहन कडू ह्या दि.०९/०१/२०१८ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच त्यांचा मुलगा संतोष मोहन कडू हा दि.२४/०२/२०१६ रोजी अविवाहित मयत झालेला आहे, सबब अर्जदार हेच कै.मोहन काथोर कडू यांचे कायदेशीर वारस आहेत.

अर्जदार यांनी के.मोहन काथोर कडू, यांच्या मृत्यूच्या पश्चात वारस दाखला मिळणेसाठी मे.दिवाणी न्यायालयात सदरचा अर्ज दाखल केला आहे. वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करण्यासंबंधी कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत, अगर तक्रार असल्यास त्यांनी त्यांचे वकीलांमार्फत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात सादर करावी. विहित मुदतीत हरकत सादर न केल्यास मे.न्यायालयात योगय त्या पुराव्यानिशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील, तसेच मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

आज दि.०१/०४/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली आहे.

सही/- क.लिपीक दि.न्या.क.स्तर, उरण — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, उरण



## PUBLIC NOTICE

Notice is hereby given that on behalf that my Clients 1) Mrs. Nirmala Avadhesh Yadav and 2) Mr. Avadesh Kumar Yadav purchased Flat No.1101, A-Wing, on 11th Floor, "E.V. Emarald Heights CHS Ltd.", Plot No.14,15,16 & 17, Sector-15, Kalamboli, Navi Mumbai-410218 and in the chain of documents of said property the following documents had been misplaced. 1] Agreement for Sale executed between the Developer M/s. E. V Homes and the Purchaser Mr. Satish Kumar, as per the Agreement for Sale dated 31/12/2010, having Reg. No. PVL-2-542/2011, dated 04/01/2011 and 2] Sale Deed executed between the Seller Mr. Satish Kumar and the Purchasers 1) Mr. Sumir Kumar Talukdar Singh & 2) Mrs. Rekha Sumir Kumar Singh, on 21.12.2015, having Reg. No. PVL-4/16227/2015, dated 21/12/2015, had been Misplace/Lost while travelling in Kalamboli.

Any Persons, Bank, Financial Institution, Company/Firm having any claim in the said agreement/properties or any part thereof are hereby required to make the same known to the undersigned at office address given herein below, along with certified copy of the documents pertaining to the claim, within 14 days hereof otherwise any claim arise after the said period, shall be deemed to be waived or abandoned

Place : Kamothe
Date : 04/05/2022

**Sd/-**
**Adv. Deepa Biju**
**Shop No.02, Kohinoor Paradise CHS Ltd., Plot No.53, Sector-12, Kamothe, Navi Mumbai-410206**



मा.सोनावणे साहेब कोर्ट

अॅड.शशिकांत काळू म्हात्रे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्रं.६२२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.६/०७/२०२२

१) भारती प्रमोद गायकवाड
वय : ५४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड
२) प्रणव प्रमोद गायकवाड
वय : २७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड
३) शितल सुरेंद्र सोनटक्के
वय : २४ वर्ष, धंदा : शिक्षण
रा.रुम क्र.३५७, नवीन वसाहत, खालापूर,
ता.खालापूर, जि.रायगड
४) पुजा मिलींद कांबळे
वय : ३० वर्षे, धंदा : नोकरी
रा.सममता नगर, बौद्धवाडा, काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड
५) रमाबाई पिठुराम गायकवाड
वय : ७५ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी सदरहू अर्जदार नं.१ याचे पती व अर्जददार क्र.२ ते ४ यांचे वडील व अर्जदार क्र.५ यांचा मुलगा कै.प्रमोद पिठुराम गायकवाड हे दि.२०/०७/२०२१ रोजी डॉ.डी.वाय.पाटील हॉस्पिटल, नेरुळ, नवी मुंबई येथे मयत झाले आहे.

कै.प्रमोद पिठुराम गायकवाड यांच्या नावे असलेल्या तसेच ताबेकब्जातील व मालकीच्या असलेल्या खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

**संपादीत मिळकतींचे वर्णन**

**मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड**

| गावाचे नाव | युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. |
|---|---|---|---|---|
| काळुंद्रे | काळुंद्रे १९६ (२२०) | १७ | ५ | ०-१५-६ |

कै.प्रमोद पिठुराम गायकवाड यांचे वर नमूद मिळकतीस अर्जदार हेच वारसदार आहेत असा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी दि.चौ.अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या. वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.प्रमोद पिठुराम गायकवाड यांचे अर्जदार हेच वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारसदाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारसदाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ४/०५/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


पृष्ठ क्र.१ वरुन...

# जनहित याचिका दाखल करणार : किरीट सोमय्या

मात्र देव आणि महाराष्ट्रातील जनतेच्या आशिर्वादाने मी वाचलो आहे, असेही त्यांनी नमूद केले. पक्षाचे प्रमुख सांगतात त्याप्रमाणे प्रवक्ता बोलत असतो आणि तेच संजय राऊत वायफळपणे बोलत असतात असे सांगतानाच संजय राऊत यांनी माझ्यावर बारा आरोप केले पण एकही आरोपाची कागदपत्रे सादर करू शकले नाहीत त्यामुळे संजय राऊत डरपोक आहेत हे सिद्ध झाले आहे. २०१९ च्या निवडणुकीत प्रदीप शर्मा शिवसेनेचे अधिकृत उमेदवार होते आणि सचिन वाझे प्रवक्ता होते आणि त्यानंतर ठाकरे सरकार आल्यावर सचिन वाझेची पुनर्नियुक्ती ठाकरे सरकारने केली. सचिन वाझे १०० कोटी वसूली हि ठाकरे सरकारची योजना आहे आणि मनसुख हिरेन यांची हत्या ठाकरे सरकारमुळे झाली आहे, असा सणसणाटी आरोपही त्यांनी केला.

कोर्लई अलिबाग येथील १९ बंगला घोटाळा लपविण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयाचा दुरुपयोग झाल्याप्रकरणी जनहित याचिका दाखल करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. श्रीमती रश्मी उद्धव ठाकरे यांनी अन्वय नाईकांकडून कोर्लई येथे ९.५ एकर जमीन १९ बंगल्यासह विकत घेतली. अन्वय नाईक आणि ठाकरे कुटुंबीय या ५. ४२ कोटी किंमत असलेल्या १९ बंगल्याची १ एप्रिल २०००९ ते ३१ मार्च २०२१ पर्यंत कर भरत होते. पण इन्कम टॅक्स रिटर्न्समध्ये हे बंगले दाखवले गेले नाहीत असे सांगून या विषयावर आज अलिबाग येथे १२ वकिलांशी जवळपास एक तास चर्चा केली असल्याचे त्यांनी पत्रकारांना सांगितले. आणि त्या संदर्भात पुढील दहा दिवसात याचिकेचे काम पूर्ण होऊन मे महिन्यात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल करणार असल्याचे नमूद करून किरीट सोमेय्या यांनी आणखी एक बॉम्ब टाकला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

### गरजेपोटी घरांसाठी अर्ज करण्यास प्रकल्पग्रस्त अनुत्सुक

**दै.रायगड नगरी । उरण**

शासनाने सिडको बाधित प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी सिडकोकडून पुराव्यासह अर्ज करण्यास सांगण्यात आले आहे. प्रकल्पग्रस्तांनी आपल्या घरांचे पुरावेही जमा करण्यासाठी प्रयत्न सुरु केले असले तरी गरजेपीटीची घरे नियमित करण्यासाठी असलेली नियमावली समोर न आल्याने प्रकल्पग्रस्त अर्ज करण्यास उत्सुक दिसत नाहीत.

देर आये दुरुस्त आये म्हणत महाविकास आघाडी सरकारने २०२२ पर्यंतची सिडको प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे प्रकल्पग्रस्त आनंदित झाले होते. मात्र ही घरे नियमित करण्यासाठी शासनाने केवळ एक शासनादेश जाहीर केला आहे.मात्र त्या संदर्भात कोणतेही नियम स्पष्ट न करता सिडकोला प्रकल्पग्रस्तांची घरे नियमित करण्याची प्रक्रिया म्हणून ज्या प्रकल्पग्रस्तांची घरे सिडको बाधित आहेत त्यांना त्या संबधी चे पुरावे सादर करून अर्ज करण्यास सांगण्यात आले आहे. हे अर्ज नवी मुंबईतील बेलापूरच्या रायगड भवन येथे सिडको कडून नव्याने सुरू करण्यात आलेल्या गरजेपोटी घर या विभागात सादर करावयाचे आहेत. मात्र जो पर्यंत प्रकल्पग्रस्तांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांचे समाधान होणार नाही तो पर्यंत अर्ज करण्यास प्रकल्पग्रस्त उत्सुक नसल्याचेच दिसत आहे.

### सर्वे येथे श्रीगणेश स्थापना दिन उत्साहात साजरा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील काशिद ग्रामपंचायत हद्दीतील सर्वे येथे श्रीगणेश स्थापना दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.दि.४एप्रिल २०१६ रोजी गावामध्ये श्रीगणेश स्थापना करण्यात आली होती.यंदा स्थापनेचे सहावे वर्ष आहे.

यादिवशी सकाळी श्री मुर्तीची विधिवत पूजा अर्चा करण्यात आली.सकाळी ७.०० वा.ते स.११.०० वा.ढोलताशा वाद्यांच्या गजरात संपुर्ण गावातून पालखी काढण्यात आली.यावेळी भाविकांनी श्रीमुर्तीचे पूजन केले.यामध्ये ग्रामस्थ, महिला तसेच युवा वर्गाचा उत्साह दिसून आला.दुपारी श्रीसत्यनारायण महापूजा करण्यात आली.यानंतर स्थानिक ग्रामस्थ मंडळाचे सुश्राव्य बहारदार भजनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला.भाविकांनी संख्येने उपस्थित राहून श्री दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला.महाप्रसादासाठी सामाजिक कार्यकर्ते भिकेश दिवेकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे औचित्य साधून गावातील स्थानिक कलाकारांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.यात स्थानिक कलाकारांनी आपली कला सादर करून रसिक जनांची मने रिझवली ! कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रामस्थ मंडळ, महिला मंडळ व युवक वर्गाने विशेष परिश्रम घेतले.

### पनवेलमध्ये कडक पोलीस बंदोबस्त; जनतेला शांततेचे आवाहन

# कायद्याचे उल्लंघन करू नये; अन्यथा कारवाईस सामोरे जावे लागेल : शिवराज पाटील

**दै.रायगड नगरी । पनवेल**

लाऊड स्पीकरच्या मुद्द्यावरून कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पनवेलमध्ये गेल्या काही दिवसांपासून चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. विशेषतः आज (बुधवार दि.४ मे) राजभरात सूरु असलेल्या लाऊड स्पीकर बाबतच्या आंदोलनाचे पडसाद पनवेलमध्ये उमटू नयेत यासाठी पोलीस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली होती. बुधवारी संपुर्ण शहरात मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यामध्ये एसआरपीएफ च्या तुकड्या बाहेरून मागवल्या मागविण्यात आल्या. तसेच ८५ अधिकारी, ४०० कर्मचारी आणि ३० होमगार्ड एवढा मोठा पोलीस बंदोबस्त परिमंडळ २ च्या हद्दीमध्ये तैनात करण्यात आला होता.



मंगळवारी (दि.३ मे) साजरा झालेला अक्षय तृतीया आणि रमजान ईदचा सण पनवेलमध्ये शांततेत पार पडला. परंतु बुधवारी भोंग्यांच्या वादावरून सुरू असलेल्या वादाच्या अनुषंगाने बंदोबस्तात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली. सर्व जाती धर्मीयांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे. कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची खबरदारी बाळगावी. तसेच आपल्या आजूबाजूला कोणताही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणारा प्रसंग घडत असल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाला संपर्क साधावा, असे आवाहन परिमंडळ २ चे पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांच्याकडून करण्यात आले. तसेच कोणीही कायद्याचे उल्लंघन केल्यास त्यावर कडक पोलिस कारवाई केली जाईल असा इशाराही त्यांनी दिला आहे. याबाबत काही जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले असून यापुढे कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई सुरूच राहील असेही पोलीस उपायुक्त शिवराज पाटील दै पुण्यनगरीशी म्हणाले.

पोलीस उपायुक्त शिवराज पाटील पुढे म्हणाले की, याआधी रमजानचा महिना सुरू होता. नुकतीच मुस्लिम धर्मीयांची ईद देखील शांततेत साजरी झाली. मंगळवारी मुस्लिम धर्मीयांची ईद व हिंदू धर्मियांचो अक्षय तृतीया हे दोन्हीही सण एकाच दिवशी साजरे झाले. या अनुषंगाने कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच सध्या सर्वत्र सुरू असलेला लाऊड स्पीकरचा वाद या दृष्टिकोनातून नवी मुंबईचे पोलीस आयुक्त बिपिनकुमार सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली विविध बैठकांचे आयोजन करण्यात आले होते. आयुक्तांच्या आदेशानुसार यापूर्वी परिमंडळ २ च्या हद्दीत मॉकड्रिल घेतले आहेत. दंगा काबु आणि शांतता कमिटीच्या बैठका प्रत्येक पोलिस स्टेशनच्या अंतर्गत घेण्यात आल्या होत्या. नागरिकांनीही पोलिसांच्या आवाहनाला खुप चांगला प्रतिसाद दिला.

समाजात शांतता राहावी यासाठी नागरिकही सतर्क आहेत. कोणताही अनुचित प्रकार निदर्शनास आल्यास सजग नागरिक पोलिसांना कळवत आहेत. परिमंडळ २ च्या हद्दीतील नागरिकांना माझे आवाहन राहील की, भोंग्यांवरून जो वाद चालला आहे आणि त्यामुळे समाजात कोणतीही तेढ निर्माण होईल आणि कोणत्याही समाजाच्या भावना दुखावल्या जाणार नाहीत याची काळजी घ्यावी. आपल्या जवळपास असे गैरवर्तन कोणी करत असेल तर त्याची माहिती त्वरित पोलिसांना द्यावी, त्यावर योग्य ती कारवाई केली जाईल. समाजात शांतता राहील याची काळजी घ्यावी, असेही शिवराज पाटील म्हणाले.

कायदा आणि सुव्यवस्था विघडवण्याचे किंवा कायदा हातात घेण्याचे काम जर कोणी केले तर त्याच्यावर कडक कारवाई केली जाईल. मग तो व्यक्ती कोणत्याही समाजाचा किंवा पक्षाचा असला तरीही त्यावर सक्त कारवाई करण्यात येईल. ज्या व्यक्ती समाजात तेढ निर्माण करतील किंवा काही गैर कृत्य करू शकतात अशी शंका होती त्या लोकांना आम्ही तडीपार केलेले आहे. काही लोकांनी आक्षेपार्ह व्हिडिओ पसरवले असून त्या लोकांवर देखील गुन्हे दाखल केलेले आहेत, अशी माहिती पोलीस उपायुक्त शिवराज पाटील यांनी दिली.

### मुस्लीम समाजाकडून सामाजिक एकोप्यासह रमजान ईद साजरी

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

पोलादपूर शहर तसेच तालुक्यातील ग्रामीण भागातील मुस्लीम वस्त्यांमध्ये सामाजिक एकोपा दर्शवित रमजान इद साजरी करण्यात आली. शहरात काँग्रेस, शिवसेना, भाजप तसेच राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी हिंदू मुस्लीम एकतेचे दर्शन घडविले.

पोलादपूर एस.टी.स्थानकाजवळील जामा मशिदीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे महमद मुजावर, महमद धामणकर, मुन्ना मुजावर, मुश्ताक मुजावर, पाणीपुरवठा सभापती प्रसाद इंगवले, काँग्रेस विरोधी गटनेता व नगरसेवक दिलीप भागवत, स्वीकृत नगर–सेवक संतोष चव्हाण, काँग्रेस शहर अध्यक्ष अमोल भुवड आदींनी मुस्लीम बांधवांसमवेत खीरकुर्माचा स्वाद घेतला. भारतीय जनता पक्षाच्या नगरसेविका अंकिता जांभळेकर निकम यांनी खारकांड मोहल्ल्यामध्ये मुस्लीम बांधवांसोबत रमजान इद साजरी केली. वार्ड नंबर १४ येथील नगरसेविका तथा भाजपा जिल्हा कार्यकारणी सदस्य सौ.अंकिता जांभळेकर–निकम यांच्यावतीने यावेळी मिठाईचे वाटप करत शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी भाजपा शहराध्यक्ष राजा दिक्षित, भाजपा युवा मोर्चा रायगड जिल्हा चिटणीस महेश निकम, प्रतिक सुर्वे, राजेश जांभळेकर, आमु पठाण, अनिकेत जांभळेकर आदी उपस्थित होते.

पोलादपूर तालुक्यातील सवाद येथे शिवसे–नेचे उपतालुकाप्रमुख शौकत तारलेकर यांच्यासह सप्तक्रोशीतील तरूण वर्गाने रमजान इद साजरी केली. पोलादपूर पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरिक्षक प्रशांत जाधव, गुप्तवार्ता पोलीस इकबाल शेख तसेच पोलीस कर्मचारी आणि होमगार्ड सुनील जगताप आदी उपस्थित होते.



### विवाहित बेपत्ता

**दै.रायगड नगरी । पनवेल**

राहत्या घरातून कोणास काही न सांगता एक विवाहिता कोठेतरी निघून गेल्याने ती हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. सौ. प्रमिला प्रमोद खंडागळे (वय ४०) राहणार पळस्पे गाव, रंग गोरा, उंची ५ फूट नाक सरळ, डोळे तिरके, चष्मा घालते, अंगात गुलाबी रंगाची साडी व हिरव्या रंगाचा ब्लाउस तसेच कानात सोन्याचे लोमते व गळ्यात सोन्याचे गंठण व मणी मंगळसूत्र तसेच पायात चप्पल आहे. या महिले बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास पनवेल पनवेल शहर पोलीस ठाणे दूरध्वनी २७४५२३३३ किंवा पोहवा ज्योती दुधाने यांच्याशी संपर्क साधावा.

### हिंद मराठा महासंघ रायगड जिल्हा अध्यक्ष पदी उद्योजक पी डी देशमुख यांची निवड

**दै.रायगड नगरी । पनवेल**

हिंद मराठा महासंघ रायगड जिल्हा अध्यक्ष पदी उद्योजक पी डी देशमुख यांची निवड संस्थापक अध्यक्ष सदानंदराव भोसले राष्ट्रीय अध्यक्ष उज्व–लसिंह राजे गायकवाडराष्ट्रीय सरचिटणीस ॲड किशोर बांदल देशमुख प्रदेश अध्यक्ष सुधीर पालांडे यांच्या सु–चनेनुसार कोकण प्रदेशाध्यक्ष निवृत सहाय्यक पोलीस आयुक्त विनोदराव चव्हाण यांनी जाहीर केली त्यांना नियुक्ती पत्र देताना राष्ट्रीय सचिव शिव–ाजीराव पालांडे रायगड जिल्हा सरचिटणीस प्रथमेश सावंत ॲड इंद्रजित भोसले सिंधुदुर्ग जिल्हा सल्लागार प्रभाकर परब ज्येष्ठ पत्रकार संजयराव कदम सहाय्यक पोलीस आयुक्त शिव–ाजीराव फडतरे उलवे शिवसेना शाखा प्रमुख सुरी गौर व अन्य मान्यवर उपस्थित होते.

---

#### जाहीर नोटीस

आरटीएस अपिल क्र.४३/२०२०

प्रति,
१) मे.न्यू मिलेनियम इंडिया प्रॉपर्टी
डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे संकेत जनार्दन भासे
रा.दहिवली तर्फे नोड, ता.कर्जत, जि.रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१) आचलचंद मिश्रीलाल बालड
रा.प्लॉट क्र.२२०१, २२ मजला ए विंग क्षितीज सोसायटी,
प्लॉट क्र.३, सेक्टर १९, सानपाडा, नवी मुंबई
२) शंकर लक्ष्मण पाटील (मयत तर्फे वारस)
२/१) सगुणा शंकर पाटील
२/२) जगदीश शंकर पाटील
रा.बोरीवली, पाताळगंगा, ता.खालापूर, जि.रायगड
३) श्री.बाळ्या उर्फ बाळाराम लक्ष्मण पाटील
रा.ठाणेन्हावे, ता.खालापूर, जि.रायगड
४) यशवंत धाकू पाटील (मयत)
४/१) सुवर्णा यशवंत पाटील
४/२) रणजित यशवंत पाटील
४/३) गणेश यशवंत पाटील
अ.क्र.४/१ ते ४/३ रा.गायकवाड चाळ, पोखरण रोड,
एस.टी.वर्क शॉपजवळ, सिद्धेश्वर तलाव, ठाणे पश्चिम
५) श्रीमती.मनीबाई दगडू डोखले (मयत)
५/१) दगडू परशुराम डोखले
६) गंगुबाई देहू पाटील
७) मोरेश्वर देहू पाटील
८) पांडुरंग देहू पाटील
रा.गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड
९) ललिता देहू पाटील
रा.कलोते मोकाशी, ता.खालापूर, जि.रायगड
१०) सुनिता नामदेव दळवी
रा.मांगरुळ, ता.पेण, जि.रायगड
११) सोनी पांडुरंग खाडे
रा.सापोली, कामार्ली, ता.पेण, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड येथील फेरफार क्रमांक ७६३ चे आदेशाविरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात अपिल दाखल केले अहे. सदर अपिलामध्ये दि.१९/०१/२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.११/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले क्र.१० व ११ यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

जमीन मिळकतीचे वर्णन

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे : गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड | १९ | ५ ब | ०–०३–८० | ०.१२ |
| | १७ | ६ | ०–४१–० | २.५६ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : कर्जत
दिनांक : १३/०४/२०२२

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत करिता**

---

#### जाहीर नोटीस

आरटीएस अपिल क्र.४८/२०२०

प्रति,
१) मे.न्यू मिलेनियम इंडिया प्रॉपर्टी
डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे संकेत जनार्दन भासे
रा.दहिवली तर्फे नोड, ता.कर्जत, जि.रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१) अरुण मोतीराम आकडे
रा.बँक कॉलनी, हाऊस नं.१ निलंगा, जि.लातूर
२) शंकर लक्ष्मण पाटील (मयत तर्फे वारस)
२/१) सगुणा शंकर पाटील
२/२) जगदीश शंकर पाटील
अ.क्र.२/१ व २/२ रा.बोरीवली, पाताळगंगा,
ता.खालापूर, जि.रायगड
३) श्री.बाळ्या उर्फ बाळाराम लक्ष्मण पाटील
रा.ठाणेन्हावे, ता.खालापूर, जि.रायगड
४) यशवंत धाकू पाटील (मयत)
४/१) सुवर्णा यशवंत पाटील
४/२) रणजित यशवंत पाटील
४/३) गणेश यशवंत पाटील
अ.क्र.४/१ ते ४/३ रा.गायकवाड चाळ, पोखरण रोड,
एस.टी.वर्क शॉपजवळ, सिद्धेश्वर तलाव, ठाणे पश्चिम
५) श्रीमती.मनीबाई दगडू डोखले (मयत)
५/१) दगडू परशुराम डोखले
रा.कलोते मोकाशी, ता.खालापूर, जि.रायगड
६) गंगुबाई देहू पाटील
७) मोरेश्वर देहू पाटील
८) पांडुरंग देहू पाटील
अ.क्र.६ ते ८ रा.गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड
९) ललिता देहू पाटील
रा.कलोते मोकाशी, ता.खालापूर, जि.रायगड
१०) सुनिता नामदेव दळवी
रा.मांगरुळ, ता.पेण, जि.रायगड
११) सोनी पांडुरंग खाडे
रा.सापोली, कामार्ली, ता.पेण, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड येथील फेरफार क्रमांक ७६० चे आदेशाविरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात अपिल दाखल केले अहे. सदर अपिलामध्ये दि.१९/०१/२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.११/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले क्र.१० व ११ यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

जमीन मिळकतीचे वर्णन

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे : गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड | ३७ | १० | ०१–०८–५ | ०.९४ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : कर्जत
दिनांक : १३/०४/२०२२

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत करिता**

---

#### जाहीर नोटीस

आरटीएस अपिल क्र.४७/२०२०

प्रति,
१) मे.न्यू मिलेनियम इंडिया प्रॉपर्टी
डेव्हलपर्स प्रा.लि.तर्फे संकेत जनार्दन भासे
रा.दहिवली तर्फे नोड, ता.कर्जत, जि.रायगड — अपिलार्थी

विरुद्ध

१) सुभाषचंद्र शिवाजीराव बुरसे
रा.एकलव्य पॉलेटेक्निक, न्यू.डी.पी.रस्ता जवळ
बी.३/९, शांतीबन हौ.सोसायटी पुणे शहर
एक्स सर्व्हीसमॅन कॉलनी पुणे
२) शंकर लक्ष्मण पाटील (मयत तर्फे वारस)
२/१) सगुणा शंकर पाटील
२/२) जगदीश शंकर पाटील
रा.बोरीवली, पाताळगंगा, ता.खालापूर, जि.रायगड
३) श्री.बाळ्या उर्फ बाळाराम लक्ष्मण पाटील
रा.ठाणेन्हावे, ता.खालापूर, जि.रायगड
४) यशवंत धाकू पाटील (मयत)
४/१) सुवर्णा यशवंत पाटील
४/२) रणजित यशवंत पाटील
४/३) गणेश यशवंत पाटील
अ.क्र.४/१ ते ४/३ रा.गायकवाड चाळ, पोखरण रोड,
एस.टी.वर्क शॉपजवळ, सिद्धेश्वर तलाव, ठाणे पश्चिम
५) श्रीमती.मनीबाई दगडू डोखले (मयत)
५/१) दगडू परशुराम डोखले
६) गंगुबाई देहू पाटील
७) मोरेश्वर देहू पाटील
८) पांडुरंग देहू पाटील
अ.क्र.६ ते ८ रा.गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड
९) ललिता देहू पाटील
क्र.५/१, ९ रा.कलोते मोकाशी, ता.खालापूर, जि.रायगड
१०) सुनिता नामदेव दळवी
रा.मांगरुळ, ता.पेण, जि.रायगड
११) सोनी पांडुरंग खाडे
रा.सापोली, कामार्ली, ता.पेण, जि.रायगड — सामनेवाले

तमाम जनतेस तसेच सामनेवाले / प्रतिवादी यांना या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड येथील फेरफार क्रमांक ७६१ चे आदेशाविरुद्ध अपिलार्थी / वादी यांनी या न्यायालयात अपिल दाखल केले अहे. सदर अपिलामध्ये दि.१९/०१/२०२१ रोजी प्रथम सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले हे या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.११/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले क्र.१० व ११ यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

जमीन मिळकतीचे वर्णन

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे : गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड | ३७ | १० | ०१–०८–५ | ०.९४ |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : कर्जत
दिनांक : १३/०४/२०२२

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत करिता**

---

#### जाहीर नोटीस

आरटीएस अपिल क्र.०६/२०२१

प्रति,
१) मे.न्यू मिलेनियम इंडिया प्रॉपर्टी डेव्हलपर्स
प्रा.लि.तर्फे निखिल सरन बिहारीलाल माथुर
रा.एटोन सुंदरवन, कॉम्प्लेक्स लोखंडवाला
सर्कल जवळ अंधेरी (पश्चिम) मुंबई ४०००५३ — अपिलार्थी

विरुद्ध

१) सखाराम दामा पाटील
२) पांडुरंग दामा पाटील मयत तर्फे वारस
२/१) द्रौपदी पांडुरंग पाटील
२/२) साळुबाई पांडुरंग पाटील
२/३) नरेश पांडुरंग पाटील
२/४) कृष्णा पांडुरंग पाटील
सर्व रा.गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड
२/५) आशा अशोक कुडाळकर
रा.आण्णा केंगार चाळ रुम नं.९, पोखरण रोड नं.१,
सिद्धेश्वर तलाव जवळ, ठाणे
३) संभाजी दामा पाटील मयत तर्फे वारस
३/१) अनुसया संभाजी पाटील
३/२) जनार्दन संभाजी पाटील
३/३) नरेंद्र संभाजी पाटील
सर्व रा.गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड
३/४) प्रतिभा प्रकाश मुंढे
रा.होराळे, ता.खालापूर, जि.रायगड
३/५) मालती संजय पाटील
रा.कसळखंड, ता.पनवेल, जि.रायगड
४) दिलीप विष्णू पाटील
रा.गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड
५) वंदना पांडुरंग ठाकूर
रा.वारंजे, ता.कर्जत, जि.रायगड
६) सुमन देवराम पाटील
रा.देहेकरवाड संभाजी नगर, ता.मुरबाड, जि.ठाणे ४२१४०१
७) मनिषा नितीन पाटील
रा.आंबेघर, ता.पेण, जि.रायगड
८) आशा मोहन पाटील
रा.खानाव, ता.खालापूर, जि.रायगड
९) स्वाती सुभाषचंद्र बुरसे
रा.एकलव्य पॉलिटेक्निक न्यु डी पी रस्त्याजवळ,
बी–३/९, शांतीबन हौसिंग सोसायटी पुणे शहर,
एक्स सर्विसमॅन कॉलनी पुणे ४११०३८ — सामनेवाले

वादी यांनी मौजे : गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड येथील फेरफार क्रमांक ८०० चे विरुद्ध दिनांक ०३/०२/२०२१ रोजी या कार्यालयात अपिल दाखल केलेले अहे. प्रस्तुतचा अपिल दाखल करणेस अर्जदार यांना विलंब झाला असल्याने अर्जदार यांनी विलंब माफीचा स्वतंत्र अर्ज सोबत दाखल केला आहे.

सदर विलंब माफीचे मुद्यावर दोन्ही पक्षकारांना त्यांचे म्हणणे मांडणेकामी प्रथम सुनावणी दि.१६/०३/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता सुनावणी घेण्यात आलेली आहे. त्यनंतर वेळोवेळी सुनावणी घेण्यात आलेल्या आहेत. मात्र सामनेवाले या न्यायालयात सुनावणीकामी हजर झालेले नाहीत. सदर अपिलाची पुढील सुनावणी दि.११/०५/२०२२ रोजी सकाळी ११.०० वाजता उपविभागीय अधिकारी कर्जत उपविभाग कर्जत, हायड्रो कॉलनी दहिवली, कर्जत, जि.रायगड येथे निश्चित करण्यात आली आहे.

सबब या जाहीर नोटीशीद्वारे सामनेवाले क्र.६ व ७ यांना तसेच वरील जमीन मिळकती संबंधित असलेल्या व्यक्तींना २१ दिवसांच्या आत उपविभागीय अधिकारी कर्जत, जि.रायगड येथे समक्ष येवून आवश्यक त्या सबळ कागदोपत्री पुराव्यांसह लेखी म्हणणे दाखल करावे. सदर विहित केलेल्या मुदतीनंतर कोणाचीही व कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**जमीन मिळकतीचे वर्णन**

| गाव | स.नं. | हि.नं. | क्षेत्र | आकार |
|---|---|---|---|---|
| मौजे : गोठीवली, ता.खालापूर, जि.रायगड | ३६ | ४ | ०–४०–० पैकी ०–२०–० | ०.५० |

सदरची जाहीर नोटीस आज रोजी माझ्या सही व शिक्क्यानिशी दिली.
ठिकाण : कर्जत
दिनांक : १३/०४/२०२२

**सही/–**
**उपविभागीय अधिकारी**
**कर्जत उपविभाग कर्जत करिता**

# मुरुडच्या समुद्रकिनारी मोठ्या प्रमाणावर तेलाचे तवंग

## नागरिक व पर्यटकांचा हिरमोड ; नगरपालिका प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । मुरुड**

कोरोना कहर ओसरल्यावर पर्यटनाला चालना मिळाली असताना गेल्या दोन दिवसांपासून मुरुडच्या समुद्र किना–यावर मोठ्या प्रमाणावर तेलाचे तवंग आल्याने नागरिक व पर्यटकांचा हिरमोड झाला असून नगरपालिका प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

मुरूड समुद्रकिनाऱ्यावर गेल्या दोन दिवसांपासून ऑइल वाहून आले असून ऑईलचे धब्बे किनाऱ्यावर ३ किमी पर्यंत दूर पसरलेले दिसून येत आहेत. त्यामुळे शतपावली करणारे असंख्य नागरिक त्रस्त झाले असून पर्यटकांना देखील याचा मोठा त्रास होताना दिसत आहे. कोणत्याही बाजूने गेलात तरी मुरूड समुद्रकिनाऱ्यावर एक प्रकारची काळी झालर आणि ऑईलचा वास सुटलेला आहे.



मुरूड समोरील समुद्रातून मुंबई, गोवा, केरळ, कडे जाणारा मुख्य समुद्र मार्ग असल्याने रात्री किंवा सकाळी मोठी जहाजांची ये –जा सुरु असते. शिवाय खोलवर समुद्रात परराज्यातील मोठ्या नौका मासेमारी करतात. मोठ्या यांत्रिक जहाजांचे मोठया नौकांचे जळलेले ऑइल कोणतीही प्रक्रिया न करता समुद्रात सोडले जाते. शिवाय ओएनजीसी प्रकल्पातुन समुद्रात नवीनपाईप टाकण्याचे काम सुरू असते. त्यातून देखील ऑइल लीक होऊ शकते अशी माहिती रायगड जिल्हा मच्छिमार कृती समितीचे अध्यक्ष मनोहर बैले, यांनी बोलताना दिली.

समुद्र पोटात काहीच ठेवत नाही. समुद्राला भरती आली की हेच ऑइल जवळील समुद्रकिनारी गोळ्यांच्या रूपाने किनाऱ्यावर पसरून किनारा विद्रुप होतो, शिवाय मासळीवर देखील परिणाम होऊन नामशेष होते. अशी माहिती देखील बैले, यांनी आधिक बोलताना दिली. ऑइल पसरल्याने किनाऱ्यावरील वाळूवर चालता येत नाही. बूट, चप्पल यांना ऑईलचे गोळे चिकटून खराब होत असून किनाऱ्याचे सौंदर्य देखील धोक्यात आले आहे.याचा येथील पर्यटनावर परीणाम होत असून नगरपालिका प्रशासनाने उपाययोजना करण्याची मागणी केली जात आहे.

# संक्षिप्त...

## तळा शहरात अवतरली शिवशाही पारंपरिक पद्धतीने शिवजयंती साजरी

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा पुसाटीवाडीत छत्रपती शिवाजी महाराज यांची पारंपरिक तिथी नुसार चैत्र शुद्ध ३ अक्षय तिथीच्या पुर्व संध्येला गेली५६वर्षापासून साजरी केली जाते.

१९६५साली कै.दगडू सांवत, भाऊ साठे, रामकृष्ण(भाऊ)टीळक, विठ्ठल टीळक, अँड. विद्याधर धामणकर, नारायण (बाळ) दलाल यांच्या संकल्पनेतून शिवमंदिर उभारणी करुन तीथी नुसार साजरी केली जाते. ती आज मिती पर्यत वारसा पुढे जपला आहे. शिव मिरवणुकीत शिवरायाची हुबेहूब जीवंत प्रतिकृती समीर (श्याम) सांवत आणी सहकारी साकारून इतिहास जागा करीत असतो हे शिवजयंती चे खासआकर्षण असते जिल्ह्यात एकमेव शिव मंदिर असलेले तळा तालुक्यातील पुसाटीवाडी. या निमित्ताने सकाळी ६ वा.महाराजांवर अभिषेक सोहळा, शिवगर्जना, ८वा. शिवज्योत, दुपारी१२वा. महाप्रसाद, ३ वा.पालखी मिरवणूक रात्री ११वा.शिवाजी महाराजांच्या जीवनशैली वर प्रश्न मंजुषा दि.३एप्रिल अक्षय तृतीया सकाळी ८ वा. श्रीसत्यनारायण महापुजा, दु.१२ ते ३ महा प्रसाद, ३ वा.मैदानी खेळ व आखाडा सायंकाळी ६ वा. पैठणी खेळ (महिला)रात्री ९ वा. नवनिर्वाचित नगरसेवकांचा सत्कार समारंभ रात्री ११ वा. सांस्कृतिक कार्यक्रम अशा भरगच्च कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला सर्व ग्रामस्थ, महींला मंडळ, मुंबईकर मंडळ पुसाटीवाडी शिवप्रेमी, शिवसैनिक सहभागी झाले होते.



## वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

# प्रगतशील शेतकरी रामचंद्र कदम यांना राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते उद्यानपंडीत पुरस्कार

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

मुंबईतून पोलादपूर तालुक्यातील बोरघर वडघर येथे मूळगांवी वास्तव्यास आलेले कापडव्यापारी रामचंद्र कदम तथा कदमशेठ यांना महाराष्ट्राचे राज्यपाल महामहिम भगतसिंह कोश्यारी यांच्याहस्ते उद्यानपंडीत पुरस्कार २ मे २०२२ रोजी नाशिक येथे प्रदान करण्यात आला.

यावेळी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी व मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली सन २०१७, २०१८ व २०१९ या वर्षांतील कृषिरत्न, कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण तसेच उद्यान पंडीत पुरस्कारांसह इतर १८९ कृषी पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, कृषी मंत्री दादा भुसे, फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे,विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवाळ यांच्यासह विभागाचे सचिव एकनाथ डवले, पुरस्कार प्राप्त शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी कंपन्याचे प्रतिनिधी आणि अधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री ना.ठाकरे हे व्हिडीओ कॉन्फरन्सिंग प्रणालीद्वारे कार्यक्रमात सहभागी झाले होते.




यावेळी बोलतांना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सर्व पुरस्कार विजेत्यांचे अभिनंदन करून आपला देश कृषी प्रधान देश आहे आणि आपण शेतकरी बांधव देशाचे खरे खुरे वैभव आहात. दोन वर्षात कोरोनाचे संकट जगभर असून आजही या संकटाचा सामना आपण करत आहोत. या दोन वर्षात अर्थचक्र मंदावलं होतं आता ते थोडं गती घेत आहे. लॉकडाऊन काळात आर्थिक चक्र सावरण्याचं काम या अन्न देवतेने केले, असे शेतकरीवर्गाचे ऋण व्यक्त केले. यावेळी मुख्यमंत्री ना.ठाकरे यांनी, पुरस्काराची रक्कम गौण आहे, शेतकऱ्यांच्या कष्टाचे मोल यातून मोजताच येत नाही. अस असलं तरी विभागाने सुधारित रकमेसाठी प्रस्ताव पाठवावा असे आवाहन अधिकारीवर्गाला केले. पोलादपूर तालुक्यातील प्रगतशील शेतकरी रामचंद्र कदमशेठ यांनी गेल्या १५ वर्षांपासून बोरावळे ग्रुपग्रामपंचायत हद्दीतील चाळीचा कोंड येथील ढवळी कामथी सावित्री नद्यांच्या त्रिवेणी संगमावर केलेल्या शेतीविषयक यशस्वी प्रयोगांमुळे राज्यसरकारने त्यांची सन २०१९ मध्ये उद्यानपंडीत पुरस्कारासाठी निवड केली. कदमशेठ यांनी त्यांच्या पत्नी, मुलगा, सुनबाई यांच्या उपस्थितीत हा पुरस्कार स्विकारला.

पोलादपूर तालुक्यात कदमशेठ यांना उद्यानपंडीत पुरस्कार मिळाल्याबद्दल पोल–ादपूर तालुक्यात विशेष आनंद व्यक्त होत आहे.

# उरण पेन्शन पार्क पर्यंत एन एम एम टी ची बस सेवा सुरु करण्याची उरण कॉंग्रेसची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

ए न ए म ए म ट ी च य ा बसेसने प्रवासी वाहतूक सेवा सकाळपासून रात्रीपर्यंत उरण शहरातील पेन्शन पार्कपर्यंत सुरू न केल्यास कॉंग्रेसच्यावतीने आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

नवीमुंबई येथील एनएमएमटीच्या बसेस याअ–ाधी उरण शहरातील पेन्शन पार्कपर्यंत सुरू सुरू करण्यात आली होती.मात्र उरण शहरातील रस्ते रुंदीकरण, कॉक्रीटीकरण करण्याच्या ना–वाखाली प्रवाशांच्या सोयीसाठी असलेली बससेवा मागील सहा वर्षांपासून बंद करण्यात आली होती.दरम्यानच्या काळात नागरिकांच्या रेट्यामुळे उरण चारफाट्यापर्यत सुरू असलेली प्रवासी वाहतूक फक्त ठराविक काळावधीसाठी सकाळी ९.३० व रात्री ८.३० ते १०.०० वाजेपर्यंत सुरू करण्यात आली आहे. दरम्यानच्या काळात एनएमएमटीच्या बसेस फक्त उरण– चारफाटा पर्यंतच येतात. त्यामुळे प्रवाशांना शहरातुन चार फाट्यापर्यत जावे ला–गते.त्यामुळे विद्यार्थी , वृद्धांना कामगार वर्ग ,महिलांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. शिवाय रिक्षाने बसस्थानका पर्यंत ये–जा करण्यासाठी अतिरिक्त ५० ते १०० रुपये खर्च करावा लागतो.

यासाठी एनएमएमटी बसेसची शहरातील ठराविक काळावधीसाठी सुरू असलेली प्रवासी वाहतूक दिवसा–रात्रीही सुरू ठेवण्याच्या मागणीसाठी बुधवारी (४) उरण शहर कॉंग्रेस कमिटीच्या वतीने मुख्याधिकारी संतोष माळी यांची भेट घेतली.

यावेळी उरण शहर कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश पाटील,रायगड जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष किरीट पाटील,गुफरान तुंगेकर , जीतेश म्हात्रे,रवींद्र मढवी, जयवंती गोंधळी ,चंदा मेवती आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मेढा आदिवासी बांधवांना वनहक्क दावे प्रमाणपत्राचे वाटप

**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुक्यातील मेढा, डूंगवाडी वाघवाडी, दळीभाग याठिकाणी वनविभागाच्या क्षेत्रामध्ये अतिक्रमण करून आदिवासी बांधवांची आपल्या उपजीविके साठी नागली, वरी, भात, आंबा, काजू याची लागवड करून शेती वर्षानुवर्षे करीत असतात अशा बांधवांना आदिवासी विकास योजना अंतर्गत शासनाच्या आदेशानुसार अशा शेतकऱ्यांचे दावे तयार करण्यात यावे. व त्यांना वनहक्क कायदा अंतर्गत जमीनीक्षेत्रा नुसार त्यांच्या नावावर करण्यात यावे.अशा शेतकरी बांधवाचे वनहक्क दावे तयार करण्यातआले होते सदर दावे मंजूर झाल्यावरसदरच्या शेतकऱ्यांना त्याचे दस्तावेज देण्यात आले.

आदिवासी शेतकरी बांधवानो आपल्याला मिळालेल्या जमीनीतून मोठ्या प्रमाणात विविध पिके घेऊन आपली गुजराण करावी व त्याचे संरक्षण, संगोपन करावे असे मौलिक सल्ला माणगांव वनपरिक्षेत्राधिकारी पी आर पाटील यांनी दिला. सदरच्या कार्यक्रमासाठी माणगांव वनपरिक्षेत्राधिकारी पीआर पाटील तळा परिमंडळ वनाधिकारी व्हीं एस पाटील, नियतक्षेत्र वन अधिकारी डी आर् दिघे, शिवनाथ पाटील, विजय पाटील तसेच मेढा गावचेआजी, माजी, सरपंच, पो–लीस पाटील तसेच मेढा पंचक्रोशीतील आदिवासी बांधव ग्रामस्थ उपस्थितीत सदरचे दस्तावेज देण्यात आले.



# सुधागड तालुका मनसेतर्फे पालीतील मारुती मंदिरात आरती व हनुमान चालीसा

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

मशिदीवरील भोंगे उतरविण्याच्या मुद्द्यावरून राजकारण चांगलंच तापलेय, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी प्रार्थना स्थळावरील भोंगे उतरविण्यासाठी दिलेली मुदत संपल्याने बुधवारी राज्यभरात मनसेच्या वतीने आंदोलन करण्यात आलंय. सुधागड तालुका मनसेतर्फे बुधवारी (ता.४) पालीतील मारुती मंदिरामध्ये आरती करण्यात आली. तसेच यावेळी छोट्या स्पीकरवर हनुमान चालीसा देखील लावण्यात आली होती. मारुती मंदिराभोवती व पाली शहरात पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. तसेच तालुक्यातील मनसेच्या १० पदाधिकारी व कार्यकर्त्यांना सी.आर.पी.सी कलम १४९ प्रमाणे नोटीस बजावण्यात आली होती.शांतता , सलोखा व सुरक्षेच्या दृष्टीने जिल्ह्यात अनेक ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त लावण्यात आला होता. जिल्ह्यात आज अनेक ठिकाणी नमाज पठनासाठी भोंगे वापरले नसल्याचे चित्र ही पहावयास मिळाले. मारुती मंदिरामध्ये आरती करण्यासाठी मनसे सुधागड तालुका अध्यक्ष सुनिल साठे, तालुका सचिव सचिन झुंजारराव, मनसे विद्यार्थी सेना सचिव भावेश बेलोसे, जांभूळपाडा विभाग अध्यक्ष शेखर चव्हाण, चव्हाणवाडी शाखा अध्यक्ष परेश वनगले, परळी माजी विभाग अध्यक्ष अल्पेश दळवी, विठ्ठल मनवे, दिनेश मोरे व विजय चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.



# नंदादीप फाउंडेशन मधील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हसू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नवीन पनवेल येथील नंदादीप फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हंसू उमटले निमित्त होते उदयोजक विनायक पोटे व विक्रम गांधी यांनी दिलेली आगळी वेगळी भेट.

श्री सहाय्य ग्रुपचे विनायक पोटे व विक्रम गांधी यांनी अक्षयतुतीयाचे औचित्य साधून नवीन पनवेल येथील नंदादीप फाऊंडेशनच्या विद्यार्थ्यांचा सण गोड करण्याच्या उद्देशाने विक्रम गांधी यांनी त्यांच्या साठी विविध वस्तू सोबत घेऊन त्याच्या कार्यलयात गेले व त्यांच्याशी संवाद साधून काही तास आनंदात घालवले व यापुढे सुद्धा तुम्हाला वेळोवेळी सहकार्य करू असे आश्वासन दिले.


## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### जाहीर ई–निविदा सूचना
### दुसरी मागणी (Second Call)

निविदा सुचना क्र.पमनपा/बांधकाम/प्रआयो/०५३/२०२२–२३ दिनांक : ०२/०५/२०२२

आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय / निम शासकीय (State Government, Central Government, Government undertaking) विभागात खालील कामासाठी पात्र अनुभवी ठेकेदाराकडून बाबन्याय दर पद्धतीनुसार (बी–२) जाहीर ई–निविदा मागवित आहेत.

| अ.क्र. | निविदा क्रमांक | कामाचे नाव | निविदा रक्कम रु. (without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/PMAY /2022-23 | Appointment of an Agency to Design, Develop, Implement, Provide Software, Carry out Draw, Physical Scrutiny of Documents, Necessary Communications, Deployment & Configuration of Post Lottery Software Application for Successful and Waitlisted Beneficiaries And Service For Allotment of Housing Schemes Under Pradhanmantri Aawas Yojana in Panvel Municipal Corporation. | Rs. 1,58,00,000/- |

या कामाच्या ई–निविदेबाबतची माहिती महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.०५/०५/२०२२ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. निविदा ०५/०५/२०२२ ते १९/०५/२०२२ ह्या कालावधीत संकेतस्थळावर उपलब्ध असेल. निविदा सादर करण्याची शेवटची दि.१९/०५/२०२२ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) आहे. संबंधित निविदाकारांनी याची नोंद घ्यावी.

सही/–
(तृप्ती सांडभोर)
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

## पनवेल महानगरपालिका
### शहर अभियंता विभाग
### जाहीर ई–निविदा सूचना
### दुसरी मागणी (Second Call)

निविदा सुचना क्र.पमनपा/बांधकाम/प्रआयो/०५३/२०२२–२३ दिनांक : ०२/०५/२०२२

Commissioner, Panvel Municipal Corporation is inviting Item rate E- Tenders (B-2) for below mentioned work from eligible and experiencd contractors of State Government, Central Government, Government undertaking.

| Sr. No. | Tender No. | Name of the Work | Cost of Tender (without GST) |
|---|---|---|---|
| १ | PMC/CE/PMAY /2022-23 | Appointment of an Agency to Design, Develop, Implement, Provide Software, Carry out Draw, Physical Scrutiny of Documents, Necessary Communications, Deployment & Configuration of Post Lottery Software Application for Successful and Waitlisted Beneficiaries And Service For Allotment of Housing Schemes Under Pradhanmantri Aawas Yojana in Panvel Municipal Corporation. | Rs. 1,58,00,000/- |

Interested tenders should note that detailed information and tender documents are available on Maharashtra Govt website "htpp://mahatenders.gov.in" from 05/05/2022 to 19/05/2022. Last date of submission of tender by way of E-tendering will be 19/05/2022 up to 17 Hrs.

Sd/-
(Trupti Sandbhor)
Add.Commissioner
Panvel Municipal Corporation